*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# ई – प्रशासन : तंत्रज्ञानाचा सुलभ आणि गतिमान आविष्कार

**डॉ. एच. एस. कुचेकर**, भाई तुकाराम कोलेकर महाविद्यालय, नेसरी. ता.गडहिंग्लज जि. कोल्हापुर.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
kuchekarhs77@gmail.com

---

**सारांश :**

ई - गव्हर्नन्स म्हणजे इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स. माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राज्यकारभार - राज्यप्रशासन चालविण्याची पध्दती म्हणजे ई- गव्हर्नन्स होय. ई- प्रशासनामुळे माहितीचे दालन खुले झाले आहे व नागरिकांना अधिक समर्थ बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय प्रशासन व्यवस्थेत ई - गव्हर्नन्सचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याचे दिसून येते. ई - प्रशासनामुळे नागरिक प्रशासनात सक्रिय सहभाग घेऊ शकतात इतकेच नव्हे तर ई- प्रशासनामुळे अनेक आर्थिक व सामाजिक संधी देखील उपलब्ध झालेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा हा प्रभाव समाजाच्या सामाजिक आणि राजकीय सीमा पार करून सर्वदूर पसरू लागला आहे. सहकारी सेवांचे वितरण करण्यासाठी माहितीचे देवाण-घेवाण करण्यासाठी, दळणवळणासाठी आणि त्याचबरोबर सरकार, जनता व व्यापार क्षेत्र यांच्या दरम्यान कार्यरत असणाऱ्या विविध सेवा व यंत्रणा तसेच सरकारी चौकटीत मोडणाऱ्या कामकाजाच्या विविध पद्धतीचे एकत्रीकरण करण्यासाठी ई - गव्हर्नन्स अनिवार्य आहे. ई - प्रशासनाद्वारे सर्व सरकारी सेवा नागरिकांना त्यांच्या सोयीनुसार तसेच कार्यक्षमता व पारदर्शक पद्धतीने पुरविण्याचा आज प्रयत्न होत आहे. कर्मचाऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी याकरिता त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. ई - गव्हर्नन्समुळे सेवायंत्रणा अधिक प्रभावी करण्यावर जोर दिला जात आहे. त्यामुळे ई - गव्हर्नन्स भारतीय प्रशासनासाठी मैलाचा दगड ठरत आहे.

**प्रस्तावना :-**

आधुनिक युग हे विज्ञान-तंत्रज्ञान व संगणक क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रात क्रांतिकारी परिवर्तन घडून आले आहे. जागतिक स्तरावर प्रत्येक राष्ट्र आपल्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. ई - गव्हर्नन्स ही संकल्पना माहिती तंत्रज्ञानाच्या विकासातून जन्माला आलेली आहे. ई - गव्हर्नन्सच्या माध्यमातून लोकांना वेगवान पद्धतीने सेवा उपलब्ध करून देता येते. प्रशासन व्यवस्थेत क्रांतीकारी बदल करता येतात. ई - गव्हर्नन्सच्या माध्यमातून सर्व सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देता येतात. त्यामुळे वेळ आणि काळाचे बंधन राहत नाही. ई - गव्हर्नन्स हे स्मार्ट प्रशासनाच्या दिशेने जाणारे एक पाऊल आहे. ई - गव्हर्नन्स म्हणजे कार्य पार **पाडण्यासाठी** आणि प्रशासनाचे परिणाम साध्य करण्यासाठी माहिती आणि संप्रेषण तत्त्वज्ञांचा वापर होय.

राज्यप्रशासनात पारदर्शकता, सुलभता, कार्यक्षमता आणि गतिशीलता निर्माण करण्यासाठी ई - गव्हर्नन्सची प्रक्रिया उपयुक्त ठरते. प्रशासनात आढळणारे भ्रष्टाचार, लाचलुचपत, दप्तर-दिरंगाई, अकार्यक्षमता, बेजबाबदारपणा, सत्तेचा गैरवापर असे दोष दूर करण्यासाठी ई- गव्हर्नन्सची आवश्यकता असते. भारतीय प्रशासनातील शासकीय खाती, शासकीय महामंडळे, बिगर शासकीय संघटना (एनजीओ) स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी उद्योगधंदे, कंपन्या. अशा सर्व क्षेत्रात ई - गव्हर्नन्सची पद्धती स्वीकारण्यात येवू लागलेली आहे.[1]

ई - गव्हर्नन्समध्ये शासनाच्या योजना लाभार्थीपर्यंत पोहोचविण्याची आणि पोहोचल्या आहेत किंवा नाही याची खात्री करून घेण्याची व्यवस्था असते म्हणजेच ई गव्हर्नन्सचा केंद्रबिंदू लाभार्थी राहतो.[2]

ई- गव्हर्नन्स प्रणालीमुळे शासनाच्या कार्यालयात जाण्याची, अर्ज सादर करण्याची किंवा माहिती मिळविण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करण्याची गरज उरली नाही. आज सर्व सेवा एका क्लिकवर उपलब्ध आहेत. ई- गव्हर्नन्समुळे शासन जनतेच्या अधिक जवळ आले आहे. ही केवळ तांत्रिक प्रणाली नसून नागरिक आणि शासन यांच्यातील संवाद अधिक सुलभ करणारा एक सामाजिक बदल आहे. भारतात डिजिटल इंडिया, आधार कार्ड, डीजी लॉकर, उमंग ॲप यासारख्या उपक्रमामुळे ई- गव्हर्नन्सचा विस्तार वेगाने होत आहे, त्यामुळे शासन अधिक पारदर्शक उत्तरदायी आणि प्रभावी बनले आहे.

**पारिभाषिक शब्द :** ई – प्रशासन, ई – गव्हर्नन्स**,** पारदर्शकता, सरकार, शासनसंस्था, नागरिक इ.

**उद्देश :-**

1. ई - गव्हर्नन्स या संकल्पनेचा अभ्यास करणे
2. ई - गव्हर्नन्सच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे

**गृहितके :-**

1. ई – गव्हर्नन्समुळे प्रशासकीय कार्यात पारदर्शकता निर्माण झाली आहे.
2. ई - गव्हर्नन्सचे वर्गीकरण समजून घेता आले.

**संशोधन पद्धती व स्त्रोत:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी प्रथम आणि द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, विविध जर्नल्समधील लेख इ. चा आधार घेतला आहे.

**विषय प्रवेश :–**

शासनाची कार्यकुशलता, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि परिणामकारकता वाढविण्यासाठी देवाण- घेवाण केंद्रे, निर्णय केंद्रे, अंमलबजावणीची केंद्रे, पूर्व–माहिती संग्रहालये या सर्वांना जोडणे, संबंधित गट व शासन यांच्यात आदान-प्रदानाची निर्मिती करणे, या सर्व प्रक्रियेला ई- गव्हर्नन्स म्हटले जाते.[3] ई- गव्हर्नन्स म्हणजे शासकीय कामकाजात सुधारणा करण्यासंबंधी अशी प्रक्रिया की, ज्यामध्ये तंत्र -विज्ञानाचा वापर केला जातो. विज्ञान तंत्रज्ञानाच्या पद्धतीचा, कौशल्याचा आणि ज्ञानाचा वापर करून राज्यांच्या विकास योजनांची अंमलबजावणी करणे होय. ई- गव्हर्नन्स या संकल्पनेचा वापर “माहिती आणि संपर्क” या तंत्रज्ञानाचा वापर या अर्थाने केला जातो. उदा. इंटरनेट, नेटवर्क, मोबाईलसेवा इ. माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना, सेवा सुविधा पुरविणे होय. ई गव्हर्नन्सच्या प्रक्रियेत माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाचा वापर करताना नागरिक, उद्योगधंदे आणि शासकीय संस्था यांच्याशी संबंध येत असतो. लोकांच्या हिताच्या, विकासाच्या दृष्टीने शासकीय योजना राबविताना नागरिक आणि शासन तसेच शासन आणि उद्योगधंदे, सेवा यांच्यामध्ये जी आंतरक्रिया घडून येते. जे परस्परसंबंध निर्माण होतात त्यामध्ये माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर केला जातो. त्यामुळे ते कार्य अधिक सुलभपणे, कार्यक्षमतेने यशस्वी होते.[4]

नागरिकांना चांगल्या सेवा सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या विविध विभागांचा रचनेत आणि कार्यात माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर अद्ययावत आणि योग्य पद्धतीने केला जात आहे. त्यामुळे नागरिकांना योग्य माहिती मिळते, प्रोत्साहन मिळते. ई- गव्हर्नन्समुळे लोकांचा प्रशासकीय सहभाग वाढला जातो. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारे नागरिकांशी संपर्क साधला जातो. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होऊन नागरिकांचे सहकार्य मिळते. ई-एज्युकेशन, ई - मेडिसीन, ई - रजिस्ट्रेशन, ई - ट्रान्सपोर्ट, ई - पोलीस व ई - कोर्ट इत्यादी शासकीय कार्यालयामध्ये संगणकीकरण इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल सेवा यांचा वापर होऊ लागल्यामुळे वेळेत आणि खर्चात काटकसर होऊ लागलेली आहे. इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर होऊ लागल्यामुळे प्रशासनातील दप्तर दिरंगाई, बेजबाबदारपणा, भ्रष्टाचार, घोटाळे, लाचलुचपत इ. दोष कमी होऊ लागलेले आहेत. माहिती आणि संपर्क साधण्यासाठी वैज्ञानिक आणि तांत्रिक साधनांचा वापर केल्यामुळे राज्यशासनात अचूकता, जबाबदारपणा, प्रामाणिकपणा, कार्यक्षमता अशा गुणांची वाढ होऊन प्रशासन लोकाभिमुख, ग्राहकाभिमुख आणि पारदर्शक झालेले आहे.

**ई-प्रशासनाचा अर्थ :-** ई- गव्हर्नन्स (ई-प्रशासन) हा 21 व्या शतकातील महत्वपूर्ण आविष्कार आहे. इलेक्ट्रॉनिक साधने उपकरणाद्वारे आणि तंत्रज्ञानाद्वारे केली जाणारी प्रशासकीय कार्ये म्हणजे ई- गव्हर्नन्स होय. ई - गव्हर्नन्सचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

1. देशाच्या विकासासाठी देशातील आर्थिक व सामाजिक स्त्रोताचे समायोजन करण्यात शासन ज्या पध्दतीने आपल्या अधिकाराचा प्रयोग करते ती पध्दत म्हणजे ई- गव्हर्नन्स होय.[5]

2. युनेस्कोच्या मते, ई- शासन म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमे वापरून शासनाने केलेली कामगिरी होय.

3. वासुदेवा यांच्या मते, ई- प्रशासन म्हणजे शासनाची कार्ये, अंतर्गत प्रक्रिया, विकास धोरण आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा, उद्योग आणि शासकीय विभाग, संस्था यांच्यात इलेक्ट्रॉनिक साधने उपलब्ध करून देणे होय.

4. व्ही. एम. राव यांच्या मते, ई - प्रशासन म्हणजे जनतेला सेवा आणि माहिती इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमाने पुरविणे होय.

5. जागतिक बँक – ई- प्रशासन म्हणजे शासनाच्या सेवा सुविधा व त्या संदर्भातील माहिती जनतेस इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सहाय्याने पुरविणे होय. थोडक्यात ई- प्रशासन पध्दतीत इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करणे म्हणजे ई- प्रशासन होय.

**ई-प्रशासनाचे स्वरूप:-**

ई - प्रशासनाला भारतीय प्रशासनाचे विकासद्वार म्हणून ओळखले जात आहे. भारतात माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने ई- प्रशासनाची सुरुवात झालेली दिसून येते. माहिती तंत्रज्ञानाचे म्हणजेच आधुनिकीकरणाचे खरे श्रेय राजीव गांधींना जाते. 1991 च्या खुल्या अर्थव्यवस्थेनंतर ई- प्रशासनाची गरज सर्वांनाच जाणवू लागली व त्यासाठी प्रयत्न होऊ लागले. ई-प्रशासनाचा वापर केवळ प्रशासना अंतर्गतच नसून इतरही क्षेत्रात ते सामावलेले दिसते.[6]

ई- गव्हर्नन्सचा वापर मोठ्या प्रमाणात झाल्याने माहितीची देवाण-घेवाण जलद वेळेत अधिकृतपणे मिळू लागल्याने प्रशासनाची कार्यक्षमता वापरण्यास मदत झाली आहे. शासनाचा कारभार पारदर्शक होण्यास मदत झाली आहे. यामधून खऱ्या लोकशाहीचे शासन प्रक्रियेत लोकांना सहभाग, कागदाचा होणारा वापर कमी झाल्याने खर्चात बचत होऊ लागली आहे, कामाची गती वाढली आहे, प्रभाव वाढला आहे, कार्यक्षमता वाढली आहे.[7]

**ई-प्रशासनाचे वर्गीकरण :-**

**1.शासनसंस्था ते नागरिक-** G to C (Government to Citizen): शासनसंस्था सरकारी वेबसाईटवरून शासकीय सेवांच्या भरती संबंधीची माहिती वेबसाईटवरून नागरिकांना मिळते. शासनाची विविध खाती इंटरनेटच्या माध्यमातून एकाच ठिकाणाहून विविध प्रकारच्या सेवा - सुविधा यांची माहिती नागरिकांना देत असतात, यासाठी ई-एज्युकेशन, ई-मेडिसीन, ई-रजिस्ट्रेशन चा वापर केला जातो.

**2. नागरिक ते शासनसंस्था-** C to G (Citizen to Government): नागरिक आपल्या समस्या, अडचणी, प्रश्न इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे शासनसंस्थेला कळवितात, यासंदर्भात ई-डेमॉक्रसी, ई-व्होटिंग इ.द्वारे लोकसंख्येची शिरगणती, लोकशाही शासन पद्धती, मतदान पद्धती या संबंधी नागरिक आपली मते, सूचना, तक्रारी शासनाकडे तंत्रविज्ञानाच्या माध्यमातून पाठवितात.

**3. शासनसंस्था ते शासनसंस्था** G to G (Government to Government): शासन संस्थेची विविध खाती नेटवर्कच्या माध्यमातून परस्परांना जोडली जातात. शासकीय धोरणांची निर्मिती आणि कार्यवाही करताना विविध खात्याकडून आवश्यक ती माहिती मागवावी लागते अर्थात नेटवर्कवरून ही माहिती त्वरित मिळू शकते, त्यामुळे वेळ आणि पैसा यांची बचत होऊ शकते. शासकीय खात्यात संगणकीकरण, वेबसाईट, इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल या माध्यमाद्वारे ई- गव्हर्नन्सची प्रक्रिया चालू असलेली दिसते.

**4. शासनसंस्था ते व्यवसाय** G to B (Government to Business): - शासनसंस्थेचा संबंध खाजगी उद्योगधंदे आणि सार्वजनिक महामंडळे यांच्याशी येत असतो. व्यवसायांना सरकारी कार्यालयामध्ये न जाता आवश्यक परवाने कर भरणे आणि विविध नियमांचे पालन करणे सोपे व्हावे यासाठी वेबसाईट नेटवर्कवरून ही माहिती पुरविण्यात येते त्यामुळे प्रशासनात काटकसर कार्यक्षमता आणि तत्परता निर्माण होऊ शकते त्यामुळे व्यवसाय करण्याची सुलभता सुधारते विविध उद्योगधंद्यामध्ये नेटवर्क वेबसाईट या माध्यमांद्वारे ई गव्हर्नन्सची आंतरक्रिया चालू असते. उदा. स्टार्टअप

**ई-प्रशासनाची (ई – गव्हर्नन्स) वैशिष्ट्ये :-**

1.**पेपर विरहित प्रशासन** - पेपर विरहित प्रशासन हे ई - प्रशासनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ई - प्रशासनात कागदाचा वापर कमी केला जातो. पेपरलेस कामामुळे केवळ वेळेतच बचत होत नाही तर पर्यावरणाचा फायदा होऊन झाडांची तोड कमी होते. प्रशासनातील प्रत्येक संचिका कागदा शिवाय असतात. प्रशासनातील माहिती, नोंदी अभिलेखात साठवून ठेवले जातात.

2**.पारदर्शकता** - पारंपरिक प्रशासनात गोपनीयतेच्या कायद्यानुसार महत्त्वाची गोपनीय माहिती या शीर्षकाखाली गुप्त ठेवली जाते. ई - प्रशासनात सरकारी माहिती निर्णय आणि योजना आभासी पद्धतीने सहज उपलब्ध होतात यामुळे निर्णय प्रक्रिया नागरिकांसाठी उघड होते. शंका, संशय कमी होतो आणि सरकारच्या कामात स्पष्टता येते.

3.**उत्तरदायित्व** - ई- प्रशासन हे तात्काळ उत्तरदायी असते. प्रत्येक आभासी कामाची नोंद ठेवली जाते. यामुळे अधिकारी त्यांच्या कृती आणि निर्णयासाठी प्रशासकाला जबाबदार राहतात. कामात विलंब झाल्यास त्याची कारणे शोधता येतात.

4**. गतिमानता-** ई- प्रशासनातील कार्य अधिक जलद गतीने पूर्ण केली जातात. कार्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने कार्याची गती वाढते, म्हणून ई - प्रशासनास गतिमान प्रशासन म्हटले जाते.[8] ई - प्रशासनामुळे सरकारी सेवा

जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून नागरिकांना 24 तास उपलब्ध होतात, त्यामुळे कामाचे तास आणि भौगोलिक मर्यादा दूर झाल्यामुळे नागरिक त्यांच्या वेळेनुसार सेवांचा लाभ घेऊ शकतात.

5. **पदसोपान पद्धतीचा अभाव**- ई - प्रशासनात पदसोपान पद्धतीचा अवलंब केला जात नाही. ई - प्रशासनात सत्ता आणि अधिकार समान स्तरावर असतात. आदेश देण्याची आणि नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया प्रत्यक्षपणे संगणकाद्वारे पार पाडली जाते.

6. **भ्रष्टाचार कमी** – ई - प्रशासनात मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे आणि सर्व प्रक्रिया आभासी पद्धतीने आणि पारदर्शक असल्यामुळे भ्रष्टाचार, लाचखोरी आणि गैरव्यवहाराची शक्यता लक्षणीयरित्या कमी होते.

**7. खर्च मर्यादित**: - ई - प्रशासनामुळे कागद, छपाई, प्रवास आणि मनुष्यबळ यासारख्या बाबीवरील खर्च कमी, मर्यादित होतो. यामुळे सेवा वितरणाचा प्रशासकीय खर्च लक्षणीयरीत्या मर्यादित होतो आणि सहकारी संसाधनांची बचत होते. या वैशिष्ट्यामुळे ई - प्रशासन हे आधुनिक प्रशासनाचे एक अत्यावश्यक साधन बनले आहे.

**ई-प्रशासनाची उपयुक्तता :-**

**1.शासकीय पातळीवर सहजता, कार्यक्षमता, जबाबदारी**:- ई- प्रशासनामुळे पूर्वी असलेली शासकीय पातळीवरील जटिलता, ताठरता संदिग्धता दूर होऊन सहजपणा प्राप्त होतो. ई- शासनाद्वारे जटील प्रक्रियेचे सुलभिकरण केले जाते. नियम, कायदे यामध्ये लवचिकता आणली जाते. परिणामी शासनाच्या प्रक्रियेमध्ये सहजपणा येतो तसेच शासन पातळीवर निर्णय प्रक्रियेची क्षमता व कार्यक्षमतेमध्ये वाढ होते. यामधून शासकीय यंत्रणा जास्तीत जास्त जबाबदार बनण्याचे पर्यावरण तयार होते, एकूणच शासनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्पादकता व कार्यक्षमता वाढते.

**2. नागरिकांना मुबलक माहितीची व सेवेची उपलब्धता**:- शासनाचा प्रत्येक विभाग, आपल्या विभागाच्या संबंधित अर्ज, कायदे, नियम प्रक्रिया, अहवाल, सार्वजनिक वादविवाद, निर्णय निश्चिती प्रक्रिया इत्यादी सर्व बाबी नागरिकांच्यासाठी आपल्या वेबसाईटवर प्रकाशित करतात. ही माहिती नागरिकांना त्यांचा वेळ, पैसा, प्रयत्न, यांची बचत करून सहजासहजी उपलब्ध होते. थोडक्यात जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व सेवा सुविधा नागरिकांना ई - शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होतात.[9]

**3. एक खिडकी योजना**:- ई - गव्हर्नन्स योजनेमुळे वेळेत श्रमात आणि खर्चात बचत होते. या योजनेमुळे लोकांना विज बिल, पाणी बिल, महसूल, लायसेन्स फी, वाहन कर, शिक्षण फी अशी बिले भरणे सोयीचे झाले आहे.

**ई-प्रशासनाची कमतरता:-**

1. **डिजिटल निरक्षरता** - आपला भारत देश विकसनशील देश असला तरी इथल्या बऱ्याच लोकांना अजूनही इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर कसा करावा याविषयी माहिती नाही, त्यामुळे ई - गव्हर्नन्सचा लाभ घेण्यात अडचणी येऊ शकतात. ई - गव्हर्नरच्या परिणामकारकतेमध्ये अडथळा येतो.

**2. इंटरनेट सुलभतेचा अभाव-** देशाच्या अनेक दुर्गम भागामध्ये इंटरनेट सुविधेचा प्रसार झाला नाही, त्यामुळे त्याच्या वापरात अडचणी निर्माण होत आहेत.

**3. मानवी संवादाचा अभाव-** सामान्य जनतेला त्यांच्या दैनंदिन कामात येणाऱ्या समस्या त्याचे निवारण करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होत नाही. त्यामुळे दिवस अखेरीस जनतेला भेडसावणाऱ्या समस्या त्यांच्या हितासाठी काम करणाऱ्यांनी ऐकून घेतल्या पाहिजेत. ई - गव्हर्नन्समुळे मानव ते मानवी संपर्क यांत्रिक झाल्यामुळे परस्पर संवाद कमी होतो.

**4. डेटा चोरीचा धोका-** हल्ली सायबर गुंडगिरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याला प्रतिबंध घालण्याची पर्यायी व्यवस्था अजून उपलब्ध नाही तसेच तांत्रिक समस्येचा बदलता बहाना सांगून कामाची टाळाटाळ केली जाते. लोकांच्या समस्याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करू शकतात.

**5. ढिलाई प्रशासन** –. "सर्व्हर डाऊन किंवा इंटरनेट काम करत नाही" या तांत्रिक कारणाद्वारे ई - गव्हर्नन्स ढिलाई प्रशासनाला प्रोत्साहन देते.

**उपाय :-**

1. केंद्र व राज्यशासनानी ई- गव्हर्नरची पद्धती आपल्या सर्व शासकीय - प्रशासकीय विभागात सुरू केले पाहिजे. त्यासाठी लागणारी पुरेशी साधनसामग्री आणि भांडवल उपलब्ध करून दिले पाहिजे.

2. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा, साधनांचा वापर करण्याविषयीचे प्रशिक्षण शासकीय सेवक वर्गाला दिले पाहिजे.

3. सामान्य नागरिकांना ई - गव्हर्नन्सची पद्धती समजावून दिली पाहिजे. त्यासाठी प्रशिक्षण केंद्रे, शिबिरे, सेमीनार भरवून त्यांना संगणक, नेटवर्क, वेबसाईट, ऑनलाइन मोबाईलसेवा यासंबंधी माहिती, ज्ञान उपलब्ध करून दिले पाहिजे. तसेच माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाच्या माध्यमाविषयी नागरिकांना प्रबोधन करून त्यांच्यात जाणीव आणि जागृती निर्माण केली पाहिजे.

4. ई – गव्हर्नन्सच्या पद्धतीमुळे आपला वेळ, पैसा, आणि श्रम वाचतात याविषयी जाणीव, जागृती, नागरिकात निर्माण झाली पाहिजे,

5. ग्रामीण भागातील नागरिकांना भाषा माध्यमाची अडचण येऊ नये, यासाठी आय. सी. टी. च्या माध्यमाद्वारे लोकांना स्थानिक भाषेत माहिती आणि तंत्रज्ञान मिळाले पाहिजे, त्याद्वारे त्यांना सेवा संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत.

**निष्कर्ष :-**

1. भारतीय प्रशासनात ई - गव्हर्नन्सच्या उपयुक्ततेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.
2. ई - गव्हर्नन्सच्या माध्यमातून सर्व प्रशासनात पेपरलेस व्यवहारावर अधिक भर दिला जात आहे.
3. ई - गव्हर्नन्सच्या माध्यमातून नागरिक आणि प्रशासन यांचा संपर्क वाढल्यामुळे शासनाच्या योजना थेट लोकापर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या हातात शासन आले आहे.
4. ई- गव्हर्नन्स हे आधुनिक भारताचे नवीन तंत्रज्ञान आहे.
5. डिजिटल इंडियासारख्या उपक्रमामुळे भारताने जगात ई - गव्हर्नन्सचा आदर्श निर्माण केला आहे.
6. ई-गव्हर्नन्समुळे भारतीय प्रशासनातील अपप्रवृत्तींना आळा बसून प्रशासनात पारदर्शकता निर्माण होताना दिसते आहे
7. अलिकडील काळात AI च्या सर्वदूर क्षेत्रातील वापरामुळे ई-गव्हर्नन्सची व्याप्ती वाढत राहणार हे निश्चित आहे.

**संदर्भसूची :-**

1. Navjyot INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal) Vol. XIII / Issue -I, March- 2024, ISSN 2277-8063. Pp-79
2. प्रा. (डॉ.) भालबा विभुते (2017), लोकशाही, निवडणुका आणि सुशासन, अकॅडमी ऑफ इनोव्हेशन्स इन एज्युकेशन, कोल्हापूर. पृ. क्र. 155
3. सुभाष भटनागर, (अनु.-सुवासिनी खेर) (2010), ई गव्हर्नमेंट, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. क्र. 17
4. प्रा. बी. बी. पाटील,(2017),लोकशाही, निवडणुका आणि सुशासन, फडके प्रकाशन,कोल्हापूर.पृ.क्र.284
5. सुभाष भटनागर, पूर्वोक्त. पृ. क्र.17
6. डॉ. उमाकांत जाधव, (संपा)(2011), विशाखा, संशोधन पत्रिका, आदित्य प्रकाशन, लातूर. पृ. क्र.12
7 प्रा. (डॉ.) भालबा विभुते, पूर्वोक्त. पृ. क्र. 156
8. Navjyot Vol. XIII / Issue -I, March- 2024, पूर्वोक्त. पृ. क्र. 121
9. Navjyot Vol. XIII / Issue -I, March- 2024, कित्ता. पृ. क्र. 81
10. प्रा. एच. बी. हेळंबे, लोकप्रशासन नवीन विचार प्रवाह, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2011.
11. प्रा. बी. बी. पाटील, लोकप्रशासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2024.